कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/हिंसंवि/२०२४-२५/१२३
दि. २६/०७/२४

# कृपया प्रसिध्दीसाठी

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये गुरुला अनन्यसाधारण महत्व आहे. किंबहुना गुरु तत्व हे आपल्या संस्कृतीचे प्रमुख बिज आहे. असे प्रतिपादन कला अकादमीचे सदस्य सचिव श्री अरविंद खुटकर यांनी केले. कला अकादमीच्या भारतीय संगीत व नृत्य विभागातर्फे आयोजित "गुरुपौर्णिमा" उत्सवाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून श्री. अविंद खुटकर उपस्थित होते. महर्षी वेदव्यास आणि त्यांचे कार्य या विषयी त्यांनी आपले विचार व्यक्त केले. कलेच्या क्षेत्रात कार्य करताना गुरु प्रती आदर व रियाज याचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. सोमवार दि.२२ जुलै २०२४ रोजी "गुरुपौर्णिमा" या कार्यक्रमाचे उद्घाटन कला अकादमीचे सदस्य सचिव श्री. अरविंद खुटकर यांच्या हस्ते दिपप्रज्वलाने झाले. याप्रसंगी व्यासपिठावर कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागाचे प्रभारी संचालक श्री. रुपेश गांवस व संवादिनीचे व्याख्याते श्री. सुभाष फातर्फेकर हे उपस्थित होते. त्यांच्याबरोबर इतर अध्यापक वर्ग उद्घाटन सोहळयास सहभागी झाले होते. कार्यक्रमात श्री. रुपेश गांवस यानी स्वागत व प्रास्ताविक केले.

नंतर विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय गायन-वादनाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यामध्ये सर्व प्रथम शास्त्रीय सहगायन सादर करण्यात आले त्यामध्ये विद्यार्थ्यांनी धृपद, तराणा आणि भजन सादर केले. या कार्यक्रमात कु. मुक्ता मिसर, कु. सत्यनारायण कळंगुटकर, कु. सदानंद झो, कु. राज्ञी फळदेसाई, श्री. शौनक ओटावणेकर, श्री. शिशिर शंखवाळकर, श्री. शुभम नाईक, श्री. वसंत च्यारी सौ. महालक्ष्मी कुलकर्णी, कु. शिवसागर नाईक, कु. विश्वजीत फडते गावकर, कु. रॉन ॲलेक्स, कु. कार्तिक आमोणकर, कु. सुरेश पाळणी, कु. शांभवी नाईक, कु. स्वरा नाईक, कु. आश्मी प्रभुदेसाई, कु. आश्मा भगत, कु. वंशिका प्रियोळकर व कु. रेणुका नाईक हे विद्यार्थी सहभागी झाले होते. त्याना तबल्यावर श्री गितेश मांद्रेकर व श्री. सुरज मोरजकर तर संवादिनीसाथ श्री. चारुदत्त गांवस व श्री. रोहित वनकर यांची बासरीची साथ लाभली. कार्यक्रमात कु. शुभम नाईक व श्री शिशिर शंखवाळकर यांनी तानपुरा साथ केली व श्री वसंत च्यारी यांची मंजिरी साथ लाभली तद्नंतर कु. ऋग्वेद जावडेकर व कु. उत्कर्षा फोंडेकर यांचे संवादिनी सहवादन झाले त्यांनी राग रागेश्री सादर केला त्यांना श्री. भार्गवराम गर्दे यांची तबला साथ लाभली. संवादिनी वादनानंतर तबला सहवादनाचा कार्यक्रम झाला त्यामध्ये कु. कौस्तुभ च्यारी, कु. योगिराज पै, कु. कामेश रेडकर व कु दिपतेज रेवोडकर यांनी ताल तिनतालमध्ये तबला सहवादन केले. त्यांना श्री. चारुदत्त गांवस यांची नगमासाथ लाभली. यानंतर बासरी वादनाचा कार्यक्रम झाला त्यामध्ये कु. अर्थव गायक यांनी राग मारु बिहाग पेश केला त्यांना श्री. भार्गवराम गर्दे यांची तबला साथसंगत लाभली. बासरीवादनानंतर गुरुवर्य श्री. सुमाष फातर्पेकर यांचा संवादिनी वादनाचा कार्यक्रम झाला त्यांनी मत्त तालामध्ये राग मधुवंती सादर केला व नंतर द्रुत तिनतालात गत वाजवून कार्यक्रमाची सांगता केली.

शास्त्रीय गायन वादनाच्या कार्यक्रमानंतर नृत्याचा कार्यक्रम सादर करण्यात आला त्यामध्ये सर्व प्रथम कु. वरदा चव्हाण, कु. प्रेरणा प्रभु व कु. दिया नागवेकर यांचे कथ्थक नृत्य झाले. त्यांना तबल्यावर श्री गितेश मांद्रेकर, संवादिनी श्री. शुभम नाईक व पढंतची साथ कु. आर्या रेगे यांची लाभली. त्यानंतर कु. उमा नाईक, कु सान्वी धुपकर, कु. कन्या नाईक, कु. कृतिका महाले कु. आरुणी प्रभु, कु. रिधिमा वेंगुर्लेकर व कु. स्पुर्ती शानबाग यांनी कथ्थक नृत्य सादर केले. त्यांना तबल्यावर श्री. पांडुरंग गांवस व श्री. सुरज मोरजकर, संवादिनी साथ श्री. शुभम नाईक, गायन साथ सौ. सम्राज्ञी आईर, बासरीसाथ श्री.

रोहित वनकर व पढंतची साथ सौ. वरदा बेडेकर यांची लाभली. कथ्थक नृत्यानंतर भरतनाटयम् नृत्याने कार्यक्रमाची सांगता झाली. त्यामध्ये कु. निधी नाईक शिरोडकर, सौ. श्रध्दा कुलकर्णी, कु. मंजिरी फुटणकर, कु. नेहाली किनळकर, कु. सान्वी केंकरे, कु. श्राव्या शेट, कु. इच्छा नाईक, कु. आरोही सुभेदार कु. वर्लिका पिसुर्लेकर, कु. गिना पाडगावकर, कु. शताक्षी फळगांवकर, कु. इशिता शेटकर, कु. आभा नाडकर्णी, कु. ॲना मारीया, नंतर कु. गौरी शानबाग, कु. अमिषा अडकोणकर कु. गौरवी फडके, कु. जानवी प्रभु म्हाबरे, कु. प्रतिका मराठे, कु. अनुश्री कोळी, कु. तृप्ती दळवी, कु. मुस्कान खानोलकर, कु. मिश्का बेग व कु. कला नाग चैत्राली या विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. त्यांना नटवंगमची साथ तसेच डॉ. सपना नाईक व सौ. मंदिरा तिरोडकर यांची लाभली. डॉ. दिप्ता रुबसुंदरम यांची गायनसाथ व श्री चेथनमुर्ती डी. आर यांची मृदंगम्ची साथसंगत लाभली. या कार्यक्रमामध्ये सौ. वरदा बेडेकर, सौ. श्रध्दा कुलकर्णी, कु. यश आपटे व कु. सिध्दी नाईक यांनी निवेदनाची बाजु सांभाळली. सौ. मंदिरा तिरोडकर यांनी आभार मानले. दुस-या दिवशी मंगळवार दि.२३ जुलै २०२४ रोजी सकाळी ठिक १0.00 वाजता कला अकादमीच्या पेडणे, केपे, काणकोण, वाळपई, सांगे व सांखळी संगीत केंद्रातील विद्यार्थ्यांचा "संगीत मेळावा" आयोजित करण्यात आला होता. सर्वप्रथम हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागाचे प्रभारी संचालक श्री. रुपेश गावस यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. त्यांच्याबरोबर हिंदुस्थानी संगीत विभागातील व संगीत केंद्रतील सर्व अध्यापक वर्ग उपस्थित होते. त्यानंतर श्री. रुपेश गांवस यांनी आपले मनोगत व्यक्त केले व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

त्यानंतर पेडणे संगीत केंद्रातील विद्यार्थ्यांचा गायन-वादनाचा कार्यक्रम झाला त्यामध्ये सर्वप्रथम कु. हर्ष नागवेकर व कु. रोहन सोपटे यांचे तबला सहवादनात ताल-तिनताल सादर केला त्यांना श्री. वेदेश बाणावलीकर यांनी नगमा साथसंगत केली. त्यानंतर कु. अनंत तळवणेकर व कु. रुद्रेश नाईक यांचे संवादिनी सहवादन झाले. त्यांनी राग भैरव सादर केला त्यांना तबला साथ श्री. वेदेश बाणावलीकर यांची लाभली व नंतर कु. सिध्दांत गोंधळी यांचे शास्त्रीय गायन झाले त्यांनी राग वृंदावनी सारंग सादर केला व मैथिली च्यारी यांनी शास्त्रीय गायनात राग-धानी सादर केला व नंतर भक्तीगीत सादर केले. त्यांना श्री. वेदेश बाणावलीकर यांची तबला साथ व श्री. राजीव बर्वे यांची संवादिनीची साथसंगत लाभली. त्यानंतर केपे संगीत केंद्रातील विद्यार्थ्यांचा गायन-वादनाचा कार्यक्रम झाला कु. सारा दलाल यांच्या शास्त्रीय गायनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यांनी राग पटदीप सादर केला त्यांना तबल्यावर कु. स्वप्नील नाईक व संवादिनीवर श्री. उदय नाईक यांनी साथसंगत केली. त्यानंतर कु. निशाल गांवकर यांचे संवादिन एकलवादन झाले. त्यांना कु. प्रशाल गांवकर यांनी तबला साथसंगत केली. संवादिनी वादनानंतर कु. स्वप्नील नाईक शिरोडकर, कु. आर्यन नाईकं व कु. स्वयम आडेल यांचे तबला सहवादन झाले. त्यांना श्री. अमित भोसले यांनी नगमा साथ संगत केली. त्यानंतर काणकोण संगीत केंद्रातील विद्यार्थ्यांचा गायन वादनाचा कार्यक्रम झाला त्यामध्ये सर्वप्रथम कु. ॠत्वी पागी हिने शास्त्रीय गायनात राग-भूप सादर केला त्यांना श्री. विपलव बांदेकर यांची तबलासाथ तसेच श्री. दत्तराज सुर्लकर यांची संवादिनीसाथ लाभली. त्यानंतर विभव भगत यांचे तबलावादन झाले. त्यांनी तिनतालात वादन केले. त्यांना श्री दत्तराज सुर्लकर यांनी नगमासाथ केली सकाळच्या सत्राची सांगता कु. ॠत्वीक वेळीप यांच्या संवादिनी वादनाने झाली त्यानी राग वृंदावनी सारंग सादर केला त्यांना तबल्यावर श्री. विपलव बांदेकर यानी साथसंगत केली.

दुपारच्या सत्राची सुरुवात वाळपई संगीत केंद्रातील विद्यार्थ्यांचा सादरीकरणाने झाली सर्वप्रथम कु. रोहन गांवकर यांनी शास्त्रीय गायनात राग यमन सादर केला त्यांना तबला साथ श्री. गितेश इंफाळकर व संवादिनी साथ श्री. शुभम नाईक यांनी केली. त्यानंतर कु. रुपेश पोळेकर यांचे तबला वादन झाले. त्यांनी ताल तिनताल पेश केला त्यांना नगमा साथ श्री. शुभम नाईक यांची लाभली. कु. सार्थक कोरगांवकर यांनी संवादिनी वादनातून राग यमन सादर केला. त्यांना तबला साथ कु. विघ्नेश राणे यांनी केली. नंतर तबला सोलो वादनामध्ये कु. वामन च्यारी यांनी ताल तिनताल सादर केला त्यांना श्री. शुभम नाईक

यांनी नगमा साथ केली व नंतर शास्त्रीय गायनात श्री. संदेश केळकर यांनी राग मालकंस सादर केला. त्यांना तबला साथ श्री. गितेश इंफाळकर व संवादिनसाथ श्री शुभम नाईक यांची लाभली. तद्‌नंदर सांगे संगीत केंद्रातील विद्यार्थी कु. श्रीशा बोरकर हिने राग भूप सादर केला त्यांना श्री. प्रज्योत देसाई यांनी तबलासाथ तर श्री उदय नाईक यांनी संवादिनीची साथ केली. नंतर कु. विहान देव यांचे संवादिनीवादन झाले. त्यांनी राग बिहाग पेश केला त्यांना तबला साथ श्री. उदय नाईक यांची लाभली. त्यानंतर कु. तेजस तोरस्कर यांचे तबला सोलोवादन झाले त्यांनी वादनात ताल-तिनताल पेश केला त्यांना नगमा साथ कु. आदित्य तांबोस्कर यांची लाभली.

दुपारच्या सत्राचा समारोप सांखळी संगीत केंद्राच्या विद्यार्थ्यांच्या गायन-वादनाने झाला. त्यात सर्वप्रथम शास्त्रीय गायनान कु. कश्मा वांतेकर हिने राग दुर्गा व कु. गौराई नाईक हिने राग भूप सादर केला त्यांना तबलासाथ श्री. प्रज्योत ताम्हणकर तर संवादिनी साथ श्री. शुभम नाईक यांची लाभली. त्यानंतर संवादिनी सहवादन झाले. त्यामध्ये कु. अद्‌वीता नाईक व कु. शौर्या माईणकर यांनी राग यमन सादर केला. त्यांना तबला साथ कु. शौर्य राणे यांची लाभली. कार्यक्रमाचा समारोप कु. वित्तेश परब, कु. सक्षम सालेलकर व कु. श्रीसाई उसपकर यांच्या तबला सहवादनाने झाला त्यांनी ताल तिनताल पेश केला त्यांना नगमा साथ श्री. दयानंद कांदोळकर यांनी केली. दुस-या दिवसाच्या कार्यक्रमाची निवेदनाची बाजु श्री. सचिन तेली, सौ वरदा बेडेकर, श्री. वेदेश बाणावलीकर, कु. प्रज्योत पर्वतकर, सौ. नितु महाले, श्री. चंद्रहास कवळेकर, कु. प्रणवी नाईक, व कु. श्रध्दा तारी यांनी सांभाळली. शेवटी श्री. सचिन तेली यांनी आभार मानले. दोन्ही दिवसाच्या कार्यक्रमाला संगीतप्रेमी रसिक मोठया संख्येने उपस्थित होते. कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे आयोजित करण्यात आलेला "गुरुपौर्णिमा" व "संगीत मेळावा" हे दोन्ही कार्यक्रम कला अकादमीच्या मा. दिनानाथ मंगेशकर सभागृहात संपन्न झाले. तद्‌नंतर गुरुपुजनाचा सोहळा संपन्न झाला.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभा)